# प्रेस नोट

जळगाव शहर पो.स्टे.
दि. ०५/०२/२०१८.

प्रति,

मा. संपादक सो
दै-----------------

## जबरी चोरी करणारी टोळी २४ तासाच्या आत गजाआड

जळगाव शहर पो.स्टे. भाग ५ गुरनं २२/२०१८ **भादवी क ३९४,३४ प्रमाणे** दि. ०४/०२/२०१८ रोजी दाखल असुन सदर गुन्हयातील फिर्यादी हेमंत वामन बडगुजर वय ४६ व्यवसाय-खाजगी नोकरी रा. रामभाऊ वाघ नगर प्लॉट नं २७ जळगाव हे व वाहन चालक अझरुद्दीन सलाउद्दीन वय २७ रा. शिवाजी नगर जळगाव असे दोघे जण जाजु मॅनेजमेंट एजन्सीच्या शिवाजी नगर ऑफिस मधुन टाटा ऐस क्रं MH-१९-S-७७२३ या गाडीत सिगारेट व चॉकलेट इ. माल घेवुन दि.०३/०२/२०१८ रोजी चोपडा येथे गेले होते. सदर मालाची विक्री करुन आलेले ३,९०,०००/- रु रोख रुपये घेवुन रात्री ०८.१५ वाजेच्या सुमारास जळगाव येथे शिवाजी नगर स्माशान भुमी जवळुन येत असतांना स्पिड ब्रेकरजवळ ४ अनोळखी इसमांनी दगड फेकुन गाडीचा काच फोडुन गाडी थांबवुन गाडी मधील फिर्यादी व वाहन चालक यांना गाडी बाहेर ओढुन मारहाण करुन जखमी करुन त्यांचे जवळील ३,९०,०००/- रु रोख रुपये ग्रे कलरच्या बॅगमधील जबरीने चोरुन स्माशानभुमीच्या दिशेने रेल्वे रुळ पट्टीने पळुन गेले होते त्यावरुन जळगाव शहर पो.स्टे. वरप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले होता.

मा.पोलीस अधिक्षक सो श्री. दत्तात्रय कराळे , मा. अप्पर पोलीस अधिक्षक सो श्री. बच्चन सिंह, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो श्री. सचिन सांगळे यांनी योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले होते. त्या अनुषंगानेच जळगाव शहर पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी श्री प्रदीप ठाकुर सो यांनी सफौ/ वासुदेव सोनवणे पोहेकॉ/ संजय भांडारकर पोना/ संजय हिवरकर पोना/विजयसिंग पाटील पोना/संजय भालेराव पोना/ गणेश शिरसाळे पोकॉ/अक्रम शेख पोकॉ/ इम्रानअली सैय्यद पोकॉ/मोहसीन बिराजदार पोकॉ/सुधीर सावळे पोकॉ/अमोल विसपुते पोकॉ/प्रणेश ठाकुर पोकॉ/रतनहरी गिते असे पथक तयार केले सदर पथकास मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो श्री सचिन सांगळे यांनी योग्य ते मार्गदर्शन करुन पोनिरी प्रदीप ठाकुर यांचे मार्गदर्शनाखाली काम करीत असतांना सदर पथकास गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली त्यावरुन सदर पथकातील पोलीस कर्मचारी यांनी बातमीची खात्री करुन योग्य सापळा रचुन १) सोनु भगवान सारवान वय २४ रा. गुरुनानक नगर शनिपेठ जळगाव २) दिपक भक्तराज गोयल वय २७ रा. गुरुनानक नगर शनिपेठ जळगाव ३) गोरख जयचंद प्रजापत वय २९ रा. चौघुले प्लॉट जळगाव ४) विजय जयवंत शिंदे वय २२ रा. चौघुले प्लॉट जळगाव अशां चार संशयीत इसमांना शिताफीने ताब्यात घेतले असुन त्यांचे अजुन तीन साथिदार हे फरार आहे. सदर संशयीत इसम यांना सदर गुन्हया बाबत विचारपुस करता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली सदर आरोपीतां कडुन ६०,०००/- रु रोख रुपये हे सदर पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे करवी हस्तगत करण्यात आलेली आहे. सदर आरोपीतां कडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

तरी सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. पो.निरी. श्री प्रदीप ठाकुर सो हे स्वत: करीत असुन त्यांचे सोबत पोहेकॉ/संजय भांडारकर करीत आहे.

पोलीस निरीक्षक
जळगाव शहर पो.स्टे.

